<u>सं.फौ.ख.क्रं. ५११/२०१५</u>

<u>नि.क्र. ९ लगत</u>

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक : १ यांची जबानी.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की:**

माझे नाव – भरत भास्कर खेंगट

वय – ५७ वर्षे व्यवसाय – नोकरी

नेमणुक - शिरुर पोलीस स्टेशन शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे.

**<u>साक्षीदाराचा सरतपास सहाय्यक सरकारी अभिव्यक्ता एस. व्ही. कदम यांचेकडून सुरु...</u>**

**०१.** दिनांक ०५.०२.२०१४ रोजी मी पोलीस ठाणे शिरुर येथे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होतो. दिनांक ०५.०२.२०१४ रोजी मी दिवाणी व फौजदारी न्यायालय शिरुर याठिकाणी कर्तव्यावर हजर होतो. पोलीस हवालदार मोरे, पोलीस स्टेशन शिक्रापुर यांनी मला फोन करुन बोलावून घेतले आणि सांगितले की, न्यायाधीश श्री ऐ. के. अवारी यांच्याकडे एक मुलगा चहा देण्यासाठी आला आहे, त्याची चौकशी करावी. त्याप्रमाणे मी त्या मुलाला कोर्ट आवाराच्या बाहेर बोलावून घेवून विचारपुर केली असता, त्याने मला सांगितले की, शिरुर नगर पालिका गाळयातील साई स्नॉक्स सेंटर याठिकाणावरुन सदरची चहा घेवून जाण्यासाठी मला हॉटेलचे मालक शकिल अब्दुल हमीद शेख यांनी सांगितले आहे. त्या मुलाचे नाव सलिम रहीम रफीक शेख, वय वर्षे १४ असे होते. तो राहणारा – मुरब्बा, ता. सितापुर, राज्य – उत्तरप्रदेश येथील होता. हॉटेलचे मालक शकिल अब्दुल हमीद शेख यांनी अल्पवयीन मुलाला कामावर ठेवले म्हणून मी त्याच्याविरोधात फिर्याद दाखल केली. आता मला ती तक्रार दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. तक्रार **निशाणी क्र. १२** वर आहे. मी आरोपीला ओळखू शकतो. आज आरोपी हजर नाही. आरोपीची हजेरी माफ करण्यात आली.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. आर. शिंदे</u>**

**०२.** साई स्नॉक्स सेंटर हे आरोपीच्या मालकीचे आहे, याबाबत मल शहानिशा केली नव्हती. साई स्नॉक्स सेंटर हे नगर परिषद यांनी बांधलेल्या गाळयामध्ये होते. मी सलीम शेख याचे आधारकार्ड किंवा कुठलाही कागदोपत्री पुरावा बघीतला नव्हता. मी सलीम शेख याला वैद्यकिय तपासणीकरिता पाठविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटपास पुर्ण. फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती**

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2026.07.02 17:23:00 +0530

**(संजय दि. वानखेडे )**

दिनांक : ०२/०७/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. १

घोडनदी–शिरुर, जि. पुणे ह्या